

# विशेष कार्य पुरस्कार

मनोगत

## ज्योति म्हापसेकर

१९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित झाल्यावर स्त्रीमुक्ती संघटनेच्या व्यापक छत्राखाली विकसित झालेल्या ज्योति म्हापसेकर यांची ओळख महाराष्ट्राला झाली ती 'मुलगी झाली हो', 'हुंडा नको ग बाई' आणि 'बाप रे बाप' या तीन नाटकांमुळे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई या सर्व प्रादेशिक भागांत या नाटकांचे प्रयोग स्त्रीमुक्ती संघटनेने घडवून आणले. अत्यंत सोप्या शब्दांत व संवादांत विविध स्तरांतील स्त्री-पुरुषांना 'स्त्रीवाद' समजावून देणाऱ्या या नाटकांनी प्रभावी भूमिका बजावून समाजप्रबोधन केले, नाटकाच्या माध्यमातून असे काम त्यापूर्वी तरी महाराष्ट्रात झाले नसावे. याचबरोबर, कचरा वेचणाऱ्यांच्या जीवनाला भिडल्यावर 'परिसर विकास' या संस्थेचा जन्म झाला. आरोग्य, शिक्षण, बचत गट यांद्वारे स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविण्यासाठी 'परिसर विकास' या संस्थेच्या माध्यमातून ज्योति म्हापसेकर यांनी केलेल्या कामामुळे त्यांना 'सामाजिक उद्योजक' म्हणून संबोधले जाते.

# जुन्या प्रश्नांची सोडवणूक करतानाच नवे प्रश्न तयार होताहेत

**स्त्री पुरुष समानता आणि मानवी हक्क प्रस्थापित करायला अजूनही बराच काळ लागणार आहे हे निश्चित! स्त्री मुक्ती संघटनेच्या स्थापनेच्या वेळी यांतल्या अनेक प्रश्नांची आम्हांला कल्पनाही नव्हती. नवे प्रश्न कळू लागल्यावर त्यासाठी जाणीव जागृती करणे, उपाय शोधणे ते लोकांपर्यंत पोचविणे अशी कामाची साखळी सुरू झाली. या साखळीत कार्यकर्त्यांची कडी महत्त्वाची होती. माझ्या आईच्या पिढीला स्वातंत्र्य मिळाल्यावर वाटायचे, घटनेने समानता दिली आहे. त्यामुळे आणि शिक्षणामुळे सर्व प्रश्न सुटतील! त्याचप्रमाणे १९७५ नंतरच्या दशकामध्ये मध्ये स्त्री चळवळीमुळे स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होईल असे आम्हांलाही वाटत होते.**

माझा जन्म अमळनेरचा. माझे वडील लक्ष्मण मिस्त्री यांना आणि त्यांच्या सर्वच कुटुंबाला सानेगुरुजींचे सान्निध्य लाभले. माझे वडील आणि आत्या उषा चौधरी हे 'धडपडणाऱ्या मुलां'पैकीच होते. पुढे शिक्षणाच्या निमित्ताने पुण्याला गेले आणि तिथून विद्यार्थी चळवळीत काम करता करता कोल्हापूरला भूमिगत झाले. तिथेच त्यांची ४२ च्या चळवळीत काम करणाऱ्या आईशी गाठ पडली.

नंतर वडील लाल निशाण पक्षाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते तर आई सुमन कात्रे संस्कृतची शिक्षिका आणि शिक्षक चळवळीतील कार्यकर्ती झाली. १९४५ साली आंतरजातीय विवाह केलेली आई त्यावेळची 'स्त्री मुक्तीवालीच' होती. तिने तेव्हाही स्वत:चे नाव बदलले नव्हते. माझ्या परिसरातील– नात्यातील सर्वच मंडळी अशी झपाटलेली होती. नगर जिल्ह्यात शेतमजूर आणि साखर कारखान्यातील कामगारांचे नेतृत्व करणारा माझा मामा मधुकर कात्रे आणि मुंबईतील कारखान्यांच्या कामगारांसाठी काम करणारे आत्याचे यजमान बाळकृष्ण बापट, त्यांची पत्नी सुलभा (आदर्श शिक्षिका) तर दुसरी आत्या उषा चौधरी पुण्यात काँग्रेसची नगरसेविका, लाल निशाणचे पुढारी श्री.कृ.लिमये, दत्ता देशमुख, यशवंत चव्हाण; आमच्या कम्युनमध्ये राहणाऱ्या आम्हा लहान मुलांची सुट्टीच्या काळात काळजी घेणाऱ्या कमल फाटक आणि लीला भोसले; जनचळवळीसाठी तन–मन–धन अर्पण करणाऱ्या अशा शेकडो लोकांच्या सान्निध्यात मी वाढले. खरे म्हणजे लाल निशाण पक्षाच्या सुरुवातीपासूनच हे सर्व कार्यकर्ते शेतमजूर, गिरणीकामगार, ऊसकामगार, कोतवाल, वनकामगार अशा अनेक असंघटितांना संघटित करण्यासाठी धडपडत होते. अत्यंत समर्पित आणि त्यागी भावनेने काम करणाऱ्या यांतील अनेकांचे आयुष्य 'नाही चिरा नाही पणती' असेच होते. 'स्त्री मुक्ती' चळवळीत काम करण्याची प्रेरणा कुठून मिळाली असा प्रश्न मला नेहमीच विचारला जातो. या सर्व ध्येयवादी लोकांच्या सान्निध्यात बाहेरून कुठूनतरी प्रेरणा घेण्याची गरजच नव्हती. त्यांच्या आठवणीमुळे हा पुरस्कार घेताना मला अतिशय संकोचल्यासारखे होत आहे. 'मुलगी झाली हो' च्या असंख्य प्रयोगांमुळे मी प्रकाशझोतात आले, हेच या पुरस्कारामागचे कारण असावे असा माझा कयास आहे.

माझी आई कविता करीत असे तर वडील चळवळीमधील गाणी अतिशय उत्तम गायचे. आई चेंबूर हायस्कूलमध्ये शिक्षिका होती आणि शाळेच्या स्थापनेतही तिचा हातभार होता. त्या परिसरातील साने गुरुजी

कथामालेत आमचे कार्यक्रम बसवायला श्रीनिवास खळे, मीराताई दाभोळकर, सोनाळकर असे दिग्गज लोक होते. त्यानंतर वरळी कोळीवाड्यातील जनता विद्यालयात सातवीपासून आईबरोबर हायस्कूलमध्ये असताना लोकसंगीत आणि खो-खो (भाई वाकडे) आणि हिंदी-मराठी गाणी यात मी रमले होते. कै.के.गो.अक्षीकरांनी संगीत नाटक आणि इंग्रजी साहित्य व चित्रपट यांच्याशी माझा परिचय करून दिला.

या पार्श्वभूमीवर घरात एकुलती एक मुलगी असलेल्या मला शिक्षण, खेळ, स्वत:चा जोडीदार निवडणे... कुठल्याही बाबतीत कसलाच विरोध झाला नाही. पण गंमत म्हणजे त्या वेळी मला राजकीय किंवा सामाजिक चळवळीत अजिबात रस नव्हता. लग्नानंतरही आपला नवरा, संसार, ग्रंथपाल म्हणून असलेली नोकरी, लहान मुलगी यांतच मी मग्न होते. ('मुलगी झाली हो' मधला एकही प्रसंग माझ्या आयुष्यात घडला नाही). १९७५च्या फेब्रुवारीतील आईच्या अपघाती मृत्यूमुळे आणि त्यानंतर लगेच झालेल्या वडिलांच्या अकाली निधनामुळे माझ्या या छोट्याशा विश्वाला तडा गेला. आईच्या कविता वाचून तिच्या जीवनाविषयी मी जास्त विचार करू लागले आणि त्या वेळी सुरू झालेल्या स्त्रियांच्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने होणाऱ्या बैठकांकडे खेचली गेले. अर्थात नवरा (सुभाष), सासूबाई (सुलोचना) यांच्या सहकार्यानेच ते शक्य झाले.

१९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर झाल्यानंतर स्थापन झालेल्या 'स्त्री मुक्ती संघटना' या आमच्या छोट्या गटाचा सुरुवातीचा काळ 'स्त्री मुक्ती म्हणजे काय' हे समजून, घेण्याचा होता. कलापथक, प्रदर्शने, भाषणे या माध्यमांतून १९७९ ते ८२ पर्यंत झालेल्या राष्ट्रव्यापी 'बलात्कार व हुंडाविरोधी मोहिमे'त आम्ही हिरीरीने भाग घेतला. त्यावेळी मी चळवळीच्या प्रश्नांवर गाणी लिहायला सुरुवात केली. पण गाण्यांना जोडणारे संवाद नाट्यरूपाने मात्र मी मला मुलगा झाल्यावर लिहिले. कारण मुलगा झाल्यावर बाईची प्रतिष्ठा कशी वाढते, हे तेव्हा मला अगदी जवळून समजले. ते लिहिण्यासाठी माझ्या सतत पाठीशी होत्या छाया दातार आणि शारदा साठे! किंबहुना त्यांच्यामुळेच मी चळवळीत आले आणि टिकले. या सर्वाला नाट्यरूप देण्यासाठी मदत केली, कै. विनोद हडपने! 'मुलगी झाली हो' म्हणजे अगदी सोप्या संवादातून 'स्त्री वाद' समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न. कुठलीही जाहिरात न करता 'मुलगी झाली हो' चे २००० प्रयोग झाले याची कारणे काय असावीत? नाटकाला प्रेक्षकांचा मिळालेला उस्फूर्त प्रतिसाद हे अर्थातच सगळ्यांत महत्त्वाचे कारण. त्याच बरोबर 'स्त्री मुक्ती संघटने'चे भक्कम पाठबळ, नाटकातील कलाकारांना त्यांच्या घरातून मिळालेले पालकांचे सहकार्य आणि नोकरी अथवा शिक्षण जिथे चालू असेल तेथील वरिष्ठांचे व सहकाऱ्यांचे सहकार्य!

स्त्री जन्माची कहाणी श्रमिकदास्याच्या कहाणीपेक्षाही जुनी आहे. श्रमिकांवरील अन्याय घराघरांत, एक एकट्यावर केले जात नसत; ते सामुदायिक असत. त्यांचा प्रतिकारही सामुदायिक होई. त्यामुळे त्यांच्यावरील अन्याय हा कहाणीचा विषय राहिला नाही. सामुदायिक संघर्षाची ती वीरकथा ठरली. स्त्रियांचे तसे नाही. कामगार-कष्टकरी म्हणून त्यांनी वरील वीरकथेत पुरुषांबरोबर भाग घेतला; पण त्यांच्या योगदानाची योग्य ती दखलही घेतली गेली नाही. त्याच वेळी स्त्री म्हणून केला जाणारा अन्याय त्या घरोघर सहन करत होत्याच. त्याचेच चित्रण या नाटकात झाल्यामुळे

**१९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर झाल्यानंतर स्थापन झालेल्या 'स्त्री मुक्ती संघटना' या आमच्या छोट्या गटाचा सुरुवातीचा काळ 'स्त्री मुक्ती म्हणजे काय' हे समजून घेण्याचा होता. कलापथक, प्रदर्शने, भाषणे या माध्यमांतून १९७९ ते ८२ पर्यंत झालेल्या राष्ट्रव्यापी 'बलात्कार व हुंडाविरोधी मोहिमे'त आम्ही हिरीरीने भाग घेतला. त्यावेळी मी चळवळीच्या प्रश्नांवर गाणी लिहायला सुरुवात केली. पण गाण्यांना जोडणारे संवाद नाट्यरूपाने मात्र मी मला मुलगा झाल्यावर लिहिले. कारण मुलगा झाल्यावर बाईची प्रतिष्ठा कशी वाढते, हे तेव्हा मला अगदी जवळून समजले.**

या नाटकाचे प्रयोग शहरी-ग्रामीण अशा साऱ्या स्त्रियांना भिडत होते.

आपल्या नोकऱ्या, व्यवसाय, शिक्षण पूर्ण करत, थोडेसे झपाटल्यासारखेच आम्ही गावोगाव हिंडत होतो, आहोत. कौटुंबिक अडचणी, मुलांची आजारपणे, क्वचित घरच्यांचा विरोध, रात्रीच्या कार्यक्रमांमुळे निर्माण होणारे ताणतणाव या सगळ्यांना तोंड देत आम्ही नवेनवे अनुभव घेत होतो आणि आमची जाणीवही वाढत होती.

या नाटकातून कार्यकर्त्यांचा एक भक्कम संच उभा राहिला, ज्यातून सुरू झाली स्त्री-पुरुष समानता यात्रेची साखळी. पश्चिम महाराष्ट्र (१९८५) विदर्भ (१९८६) कोकण (१९८७) आणि मराठवाडा (१९८९) उत्तरप्रदेश (१९९१) आणि उत्तर महाराष्ट्र (२०००) असे झंझावाती दौरे. त्यात एकावेळी ५० ते ६० स्त्री-पुरुष सहभागी होऊन विद्यार्थ्यांशी चर्चा, पोस्टर प्रदर्शन, परिसंवाद आणि नाटकाचे जाहीर प्रयोग असा कार्यक्रम रोजच असे.

यात्रांमधून परत आल्यावर या तरुण कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे 'स्त्री मुक्ती संघटने'च्या कामाचा विस्तार झाला. स्त्री समस्या निवारण केंद्र (१९८५), प्रेरक ललकारी (१९८६) पाळणाघरे (१९८९) साक्षरता मोहीम आणि रेशनिंगची चळवळ (१९८९), असे कार्यक्रम धडाक्यात सुरू झाले. १९९३ च्या दंगलीनंतर वस्तीमधील काम थोडे थंडावले. पण १९९६ मध्ये नव्या दमाच्या कार्यकर्त्यांबरोबर वस्तीतील कुमारवयीन मुलांसाठी 'जिज्ञासा' हा जीवनशिक्षण उपक्रम सुरू झाला. त्याला स्व. हेमंत करकरे आणि डॉ.आनंद नाडकर्णी यांची मोलाची मदत झाली. या अंतर्गत आजवर जवळ जवळ पाच लाख मुलांची शिबिरे घेण्यात आली आहेत.

वस्तीमधील कार्यक्रमांमुळे मुंबईतील कचरावेचकांच्या जीवनाची थोडीशी कल्पना आली. यावर विचारमंथनही चालू होते. त्यातूनच परिसर विकास हा एक वेगळा उपक्रम सुरू झाला, ज्यात केवळ कोरड्या कचऱ्यावर लक्ष केंद्रित न करता ३००० महिलांचे बचत गट, आरोग्य सुविधा आणि महिलांचे खत प्रशिक्षण, विमा योजना, बचतगटांचे फेडरेशन, कंत्राटे मिळविण्यासाठी सहकारी संस्था असे एका पाठोपाठ एक उपक्रम सुरू झाले. पुन्हा कार्यकर्त्यांची, हितचिंतकांची एक फौज कामाला लागली. सर्वेक्षण करण्यापासून विविध तंत्रे शिकण्यापर्यंत सगळी कामे महिला करू लागल्या. २००२ साली भाभा अणुशक्ती संशोधन केंद्राच्या डॉ. शरद काळेंनी महानगरांच्या कचऱ्यासाठी विकसित केलेल्या 'निसर्गऋण बायोगॅस प्रकल्पा'ने तर ज्ञानाचे एक नवीनच दालन आमच्या समोर खुले झाले. यात कचरा, पर्यावरण, हवामान बदल या सर्वांची सांगड असल्याने यातून आमच्या पर्यावरणाविषयक जाणिवा प्रगल्भ करण्याचे काम या प्रकल्पाने केले. आमच्या परिसर भगिनीही उत्साहाने हे तंत्र शिकल्या आणि या प्रकल्पात काम करू लागल्या. हे करता करताच त्यांच्या मुलांनी शिकावे यासाठी शिक्षण साहाय्य अभियान सुरू झाले. त्यासाठीही शेकडो संघटित कर्मचाऱ्यांचे मदतीचे हात पुढे आले. कचरा वेचकांच्या राष्ट्रीय आघाडीतर्फे आंतरराष्ट्रीय पातळीवर हे उपक्रम मांडण्याची संधी आम्हांला मिळाली. जुने उपक्रम करता करता नव्या कामाची व्याप्तीही वाढत गेली.

स्त्री पुरुष समानता आणि मानवी हक्क प्रस्थापित करायला अजूनही बराच काळ लागणार आहे हे निश्चित! स्त्री मुक्ती संघटनेच्या स्थापनेच्या वेळी यांतल्या अनेक प्रश्नांची आम्हांला कल्पनाही नव्हती. नवे प्रश्न कळू लागल्यावर त्यासाठी जाणीव जागृती करणे, उपाय शोधणे ते लोकांपर्यंत पोचविणे अशी कामाची साखळी सुरू झाली. या साखळीत कार्यकर्त्यांची कडी महत्त्वाची होती. माझ्या आईच्या पिढीला स्वातंत्र्य मिळाल्यावर वाटायचे, घटनेने समानता दिली आहे. त्यामुळे आणि शिक्षणामुळे सर्व प्रश्न सुटतील! त्याचप्रमाणे १९७५ नंतरच्या दशकामध्ये मध्ये स्त्री चळवळीमुळे स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होईल असे आम्हांलाही वाटत होते. पण आता तर अस्तित्वाचाच प्रश्न स्त्री लिंगी गर्भपातामुळे निर्माण झाला आहे. त्याचबरोबर पुरुषांची बरोबरी करण्याच्या नादात त्यांचे दुर्गुणही घेण्यास स्त्रियांनी सुरुवात केली आहे. जुन्या प्रश्नांची सोडवणूक करतानाच नवीन प्रश्न तयार होत आहेत. ते सोडविण्याचे आव्हान आता स्वीकारायला हवे.

**ज्योति म्हापसेकर**
बिल्डिंग नं. ११६, फ्लॅट नं. ३९७८, टिळकनगर,
गीतगोविंद सोसायटी, चेंबूर, मुंबई ४०००८९.
मोबा. : ९८६७७२४५२९
smsmum@gmail.com

ओळख

सुलक्षणा महाजन

# सामाजिक उद्योजक

ज्योति ही खरोखर जगन्-मैत्रीण आहे. दोन दशकांपूर्वी जेव्हा इंटरनेट नव्हते, तेव्हाही प्रत्यक्ष भेट आणि टेलिफोन ही दोन संपर्क माध्यमे ह्यांच्या द्वारे केलेला ज्योतिचा लोकसंग्रह अफाट होता. त्या लोकसंग्रहाला तेव्हा भारताच्या सीमांची मर्यादा असली तरी ज्योतिचे जागतिक नेटवर्क आकार घेऊ लागले होते.

त्याआधी १९८०च्या दशकामध्ये 'मुलगी झाली हो' हे नाटक ज्योतिच्या लोकसंग्रहाचे मुख्य साधन झाले होते. भारताच्या अनेक राज्यांमध्ये नाटकाला निमंत्रणे येत होती. अनेक भारतीय भाषांमध्ये नाटकाचे भाषांतर झाले होते. नाटकाच्या माध्यमातून महिलांमध्ये जागृती करण्याचे, संघटना बांधण्याचे काम अनेक स्त्री संघटना करीत होत्या. परदेशी स्त्रियाही सहजपणे ज्योतिशी जोडल्या जात होत्या. ख्रिस्टीन गिलेस्पी ही ऑस्ट्रेलियाची. कोल्हापूरला 'मुलगी झाली हो' बघायला ती आली आणि थोड्याच काळात ज्योतिची आणि स्त्रीमुक्ती संघटनेची मैत्रिण झाली. १९९४साली ज्योतिला 'मुलगी झाली हो' नाटकाची लेखिका म्हणून जागतिक नाट्य लेखिकांच्या परिषदेसाठी आमंत्रण आले तेव्हा अकरा जणींची ऑस्ट्रेलियातील राहण्या-जेवण्याची, लोकांना भेटण्याची, ऑस्ट्रेलिया बघण्याची सर्व व्यवस्था ख्रिस्टीनने केली. तेथील स्त्री अभ्यास केंद्रांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये तिने नाटकाचे प्रयोग घडवून आणले. स्त्री प्रश्नांवर चर्चा आयोजित केल्या. त्या परिषदेनंतर ज्योति जागतिक नाट्य लेखिका संस्थेच्या कार्यकारिणीची सभासद झाली आणि २०१०साली तिने आंतरराष्ट्रीय स्त्री नाटक लेखिकांचा एक आठवड्याचा मेळावा मुंबई विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या मदतीने भरविला, यशस्वी केला.

'मुलगी झाली हो' नंतर ज्योतिने स्त्री समस्यांना समाजापुढे आणणारी 'हुंडा नको ग बाई' आणि 'बाप रे बाप' ही नाटकेही लिहिली. खऱ्या अर्थाने ज्योतिच्या कामाचा विस्तार झाला तो 'परिसर विकास' ह्या कचरा वेचक महिलांच्या संघटनेच्या स्थापनेपासून. स्त्री समस्यांसंबंधी आणि त्यांच्या सामाजिक-राजकीय-आर्थिक दुय्यम स्थानासंबंधी जनजागृती आणि चळवळ करता करताच ज्योति कचरावेचक महिलांच्या आणि पर्यावरण रक्षणाच्या कामामध्ये सक्रिय झाली. ८९सालापासून स्त्रीमुक्ती संघटना चेंबूर धारावी भागात- रेशनची समस्या आणि स्त्री साक्षरता ह्या बाबतींमध्ये काम करीत असतानाच रस्तोरस्ती हिंडून कागद, प्लॅस्टिक कचरा वेचणाऱ्या महिलांशी तिची नाळ जोडली गेली. त्यांच्या वस्तीमध्ये 'मुलगी झाली हो' चा प्रयोग केला. प्रश्न आणि पार्श्वभूमी समजून घेण्याच्या हेतूने मुंबईमध्ये कचरा वेचणाऱ्या दोन हजार महिलांचे सामाजिक-आर्थिक आणि कौटुंबिक सर्वेक्षण 'स्त्री मुक्ती

संघटने'ने केले. त्याच वेळी मुंबईमधील कचरा व्यवस्थापनाची, त्यातील त्रुटींची, महानगरपालिकेतील संघटित घनकचरा कामगार आणि त्यांच्याच बरोबरीने काम करणाऱ्या असंघटित कचरा वेचणाऱ्या महिला ह्यांच्या योगदानची ज्योतिला माहिती होत गेली. ह्या असंघटित महिलांच्या कामाचे, आरोग्याचे, कौटुंबिक समस्यांचे आणि त्यांच्या मुलांच्या भवितव्याचे प्रश्न सोडविणे व्यावसायिक संघटनेच्या माध्यमातूनच शक्य होईल, हे लक्षात आले.

मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नाने ज्योतिला अक्षरशः झपाटले. त्याच काळात सुप्रीम कोर्टाचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधी सरकारला स्पष्ट निर्देश देणारा निकाल आला. बंगलोरच्या अलमित्रा पटेल ह्या महिलेचे ते यश होते. २००० साली त्या संबंधीचे कायदे केले गेले आणि ह्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ज्योतिची धडपड सुरू झाली. मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या सहकार्याने कचरावेचक महिलांना ओळखपत्रे मिळवून देणे; नागरी भागातील कचरावेचक महिलांचे बचत गट स्थापन करणे; त्यांना सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे लाभ मिळवून देणे, ही कामे सुरू झाली.

कोरडा कचरा हा एक मोठा आर्थिक व्यवसाय आहे आणि त्यात मोठ्या प्रमाणावर कचरा माफियाही असतात. त्या स्पर्धेला व्यावसायिक पद्धतीनेच तोंड द्यावे लागेल हे लक्षात घेऊन काम सुरू झाले. कचरा हा व्यवसाय आहे हे समजल्यानंतर तंत्रज्ञान, अर्थकारण, व्यवस्थापन, उत्पादन क्षमता अशा अनेक गोष्टींचा विचार सुरू झाला. त्यासाठी ओला कचरा, सुका कचरा, संशोधन, यंत्र-तंत्रे, व्यवस्थापन पद्धती ह्यांची माहिती गोळा करतानाच कोरडा कचरा म्हणजे सोने आहे ह्याची जाणीव झाली. परिसर विकास उद्योगाने आकार घेतला. अहमदाबादच्या श्रीमती इला भट ह्यांनी परिसर विकास केंद्राचे उद्घाटन करताना दिलेला संदेश अंमलात आणणे हा 'परिसर विकास'चा मूलमंत्र झाला. कचरा वेचक महिलांचे प्रशिक्षण सुरू झाले. त्यामध्ये महिलांचे आरोग्य, कौटुंबिक समस्या, पुरुष प्रधान व्यवस्था, नागरी व्यवस्थापन, मुलींचे शिक्षण, पर्यावरण, कायदे अशा विषयांचा समावेश केला गेला. त्यासाठी अभ्यासक्रम तयार झाला; पुस्तके लिहिली गेली. मुंबई महापालिका आणि खाजगी संस्थांच्या देणग्यांमधून देवनारच्या कचरा डेपोच्या वस्तीजवळच प्रशिक्षण केंद्र उभे राहिले. त्यांच्या कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे हा हेतूही महत्त्वाचा होता. कचरा वेचणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी खेळघर, मुलींच्या शिक्षणासाठी मदत, असे उपक्रम सुरू झाले. मुंबईमधील अनेक संस्थांनी कचरा वेचणाऱ्या कुटुंबातील मुलींच्या शिक्षणासाठी खूप आर्थिक बळ दिले. परिसर विकासामुळे देशी परदेशी सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांशी संबंध येऊ लागला.

कोरड्या प्रमाणेच ओला म्हणजेच जैविक कचरा हा सुद्धा सोन्याइतकाच मूल्यवान असतो पण तो वेगळा केला जात नसल्याने कचरा वेचक महिलांचे आरोग्य धोक्यात येते. शिवाय ह्या कचऱ्यामध्ये तेव्हा माफिया नव्हते. ओल्या कचऱ्याचे सोने म्हणजेच खत करण्याचा उद्योग कचरा डेपोमध्ये सुरू झाला. कालांतराने मुंबईच्या भाभा अणुशक्ती केंद्राचे डॉ.शरद काळे ह्यांनी तयार केलेले निसर्ग खत प्रकल्पाचे, जैविक कचऱ्यापासून उपयोगी वायू आणि खत

**सातत्याने सर्वांकडून काही ना काही शिकत रहाणे, स्वत: कोणत्याही वैचारिक सापळ्यात न अडकणे आणि त्यासाठी स्वत:मध्ये सातत्याने बदल घडविणे हे ज्योतिचे वैशिष्ट्य आहे. स्वत:च्या आणि संघटनेच्या क्षमता वाढवीत नेणे; त्यासाठी संगणक, इंटरनेट ह्या सारखी अद्ययावत माध्यमे वापरणे; व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांकडून आर्थिक व्यवस्थापनाचे, वैज्ञानिकांकडून विज्ञानाचे, तंत्रज्ञांकडून तंत्रज्ञानाचे आणि कलाकारांकडून कलेचे धडे घेणे हे ती सातत्याने करत असते. अनेक व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी तिला मदत करायला आणि 'परिसर विकास', 'स्त्री मुक्ती संघटने'त अनुभव घेण्यासाठी देशा-परदेशांतून येतात तेव्हा त्यांच्याकडून संघटनेच्या कामाचेही ऑडिट करून घेत असते.**

बनविण्याचे तंत्रज्ञान 'परिसर विकास'च्या मदतीने प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. कचरा उद्योगाचा विस्तार ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई येथेही झाला. 'स्त्री मुक्ती' संघटना आणि 'परिसर विकास'च्या ह्या कामाची नोंद राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर घेतली जाऊ लागली. ज्योतिला अशोका फाऊंडेशनने फेलोशिप दिली. त्यातून तिचे जागतिक सामाजिक नेटवर्क अधिकच विस्तारले. २००९साली संयुक्त संघराज्यांच्या हवामान बदल विषयक परिषदेमध्ये भाग घेण्यासाठी ज्योतिला आणि विशेष म्हणजे कचरा वेचण्याचे काम करणाऱ्या आणि 'परिसर विकास'च्या अध्यक्ष असणाऱ्या साबळे बाईंना खास आमंत्रण मिळाले. तेथे 'परिसर विकास'च्या कामाला जागतिक दाद मिळाली. त्यानंतर २०१०साली ज्योतिला अमेरिकेच्या अतिशय मानाच्या क्लिंटन फाऊंडेशनने सन्मानित केले.

ज्योति 'स्त्री मुक्ती संघटने'ची अध्यक्ष असली तरी प्रत्येक काम ती कार्यकर्ती म्हणूनच करीत असते. सर्व ऊर्जा एकवटून, झोकून देऊन काम करणे ही ज्योतिची कार्यपद्धती. तिच्या ह्या कामाच्या झपाट्याने 'परिसर विकास'मधील

**स्त्रियांची गरिबी, बेकारी, अज्ञान, अशिक्षितता, अंधश्रद्धा, अत्याचार ह्या सर्व गोष्टींचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे हे ज्योति जाणते आणि म्हणूनच तिचे काम कधीही एकांगी नसते.**
**आज सामाजिक-राजकीय क्षेत्रावर संकुचित आणि स्वार्थी मानसिकतेचा प्रभाव आहे. एकांगीपण आणि दुराग्रह ह्यांचा शापही अनेक चळवळींना मिळालेला दिसतो. अशा वेळी ज्योति ह्यापासून कशी काय दूर राहिली असेल, असा प्रश्न नेहमी माझ्या मनात येतो.**

महिलाही वेगाने कामाला लागतात. त्यासाठी ज्या कोणाची मदत मिळण्याजोगी असते त्या सर्वांना ती जाऊन भेटते. कधी शासकीय धोरणातील तरतुदी अंमलात आणण्यासाठी, कधी 'परिसर' भगिनींच्या संघटनेला आर्थिक बळ मिळवण्यासाठी, कधी माहिती तर कधी तंत्रज्ञान मिळवण्यासाठी ती धडपडत असते. विशेष म्हणजे तिच्या तळमळीकडे बघून महानगरपालिकेचे वा राज्य सरकारचे अधिकारी, नगरसेवक, मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, आर्किटेक्ट, इंजिनिअर्स असे लोक तिला तत्परतेने मदत करतात. अनेक सरकारी कार्यालयातील महिला अधिकारी तर तिच्या मैत्रिणीच बनतात आणि सरकारी प्रकल्प राबविण्यासाठी तिची आणि 'स्त्री मुक्ती संघटने'ची मदत घेतात. 'स्त्री मुक्ती संघटने'चा 'जिज्ञासा प्रकल्प' हा असाच सहकार्यातून उभा राहिला आहे. महापालिकेच्या शाळांमधील मुलामुलींच्या लैंगिक शिक्षणासंबंधी जागरूकता निर्माण करणारा हा प्रकल्प पोलिस कमिशनर स्व. हेमंत करकरे आणि ठाण्याचे डॉ. आनंद नाडकर्णी ह्यांच्या सहकार्याने सुरू झाला. महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या सात लाख मुलामुलींना आजपर्यंत त्याचा लाभ मिळाला आहे.

एका वेळी अनेक प्रकारची कामे करणे यामध्ये ज्योतिचा हातखंडा आहे. तिची स्मरणशक्ती अफाट आहे. ॲकॅडेमी ऑफ आर्किटेक्चर (रचना) कॉलेजमध्ये मुख्य लायब्ररियन म्हणून काम करीत असताना ज्योति सहकाऱ्यांना कामे सांगत असे; विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात उपयोगी ठरतील अशी पुस्तके सुचवत असे, त्याचवेळी त्या मुलामुलींची माहिती स्वत:च्या मेंदूत साठवीत असे. त्यांच्या काही समस्या असतील तर त्याही सोडविण्याचा प्रयत्न करीत असे आणि मुख्य म्हणजे त्यांच्या समस्या सोडवू शकणाऱ्या व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करून देत असे. पर्यावरण प्रश्नाच्या जागतिक समस्येचे भान तिला तेथील कामातून मिळाले. कॉलेजनेही ज्योतिला तिच्या कामात वेळोवेळी अनेक प्रकारचे साहाय्य केले आहे. विद्यार्थिनींच्या अभ्यासाच्या, नोकरीच्या आणि कौटुंबिक समस्यांतही ज्योति ही विद्यार्थ्यांना मोठा आधार असे.

स्त्रियांच्या आणि विशेषत: गरीब स्त्रियांच्या कोणत्याही समस्यांना सोपी, साधी उत्तरे नसतात. संस्कृती, धर्म, जात, समाज, अर्थव्यवस्था, राजकारण, पर्यावरण ह्यांच्याशी तसेच स्थळ, काळाशी त्या निगडीत असतात. अनेकदा त्या वैयक्तिक पातळीवर व्यक्त होत असल्या तरी बहुतेक वेळेला त्यांचे स्वरूप खूप व्यापक असते. स्त्रियांची गरिबी,

बेकारी, अज्ञान, अशिक्षितता, अंधश्रद्धा, अत्याचार ह्या सर्व गोष्टींचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे हे ज्योति जाणते आणि म्हणूनच तिचे काम कधीही एकांगी नसते. आज सामाजिक–राजकीय क्षेत्रावर संकुचित आणि स्वार्थी मानसिकतेचा प्रभाव आहे. एकांगीपण आणि दुराग्रह ह्यांचा शापही अनेक चळवळींना मिळालेला दिसतो. अशा वेळी ज्योति ह्यापासून कशी काय दूर राहिली असेल, असा प्रश्न नेहमी माझ्या मनात येतो.

ज्योतिची सामाजिक तळमळ, गरिबांच्या स्थितीसंबंधीची काळजी आणि स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणाची जाणीव असे अनेक पैलू लाल निशाण पक्षाशी बांधिलकी मानणाऱ्या तिच्या आई वडिलांकडून मिळाले असावेत. परंतु तिचे वास्तवाचे भान आणि प्रत्यक्ष व्यवहारातील काम हे सैद्धांतिक साम्यवादी तत्त्वांत बसणारे नाही. 'करुणा' हा तिच्या मूलभूत पेशी रचनेचा डीएनए आहे. रचनात्मक, नावीन्यपूर्ण, सृजनशील कामाचा पसारा त्यातून निर्माण झाला आहे. आदर्शवादाने भारलेल्या लोकांना सहसा व्यावहारिक आणि व्यावसायिक बाबींबद्दल एक आकस असतो. आर्थिक व्यवहारांबद्दल तिटकारा असतो. परंतु ज्योति त्याला अपवाद आहे. तिला वास्तवातील सर्व प्रकारच्या मर्यादांचे भान असते आणि उपलब्ध साधनांमधूनच मार्ग काढून जास्तीत जास्त सामाजिक लाभ मिळविण्यासाठी तिची धडपड असते. त्यामुळेच तिची सृजनशीलता, कल्पकता जितकी तिच्या गाणाऱ्या गळ्यातून आणि नाटकातून व्यक्त होते, तितकीच ती तिच्या उद्योगशीलतेतूनही दिसते. ज्योतिला सातत्याने प्रोत्साहन देणाऱ्या अनेक व्यक्ती आहेत. त्यात शारदा साठे ह्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.

ज्योतिच्या कामामधून तिने अफाट लोकसंग्रह केला आहे. 'परिसर विकास'मधील कचरा वेचक महिलेच्या झोपडीतील घरी ती ज्या सहजपणे जाते तितक्याच सहजपणे ती मोठ्या मोठ्या कंपन्यांच्या, बँकांच्या मुख्याधिकाऱ्यांशीही नाते जोडते. कचरा वेचणाऱ्या असंघटित महिलांसाठी अनेक मोठ्या कंपन्यांतील कचरा व्यवस्थापनाचे काम मिळविणे हे तिला सहज जमते. त्याच बरोबर नागरी प्रशासकीय अधिकारी, सरकारी अधिकारी, सचिव आणि डॉ.अनिल काकोडकर ह्यांच्यासारख्या जगप्रसिद्ध वैज्ञानिकांशी तिचे असलेले सौहार्दपूर्ण संबंध हे आश्चर्यचकित करणारे असतात. सातत्याने सर्वांकडून काही ना काही शिकत रहाणे, स्वत: कोणत्याही वैचारिक सापळ्यात न अडकणे आणि त्यासाठी स्वत:मध्ये सातत्याने बदल घडविणे हे ज्योतिचे वैशिष्ट्य आहे. स्वत:च्या आणि संघटनेच्या क्षमता वाढवीत नेणे; त्यासाठी संगणक, इंटरनेट ह्या सारखी अद्ययावत माध्यमे वापरणे; व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांकडून आर्थिक व्यवस्थापनाचे, वैज्ञानिकांकडून विज्ञानाचे, तंत्रज्ञांकडून तंत्रज्ञानाचे आणि कलाकारांकडून कलेचे धडे घेणे हे ती सातत्याने करत असते. अनेक व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी तिला मदत करायला आणि 'परिसर विकास', 'स्त्री मुक्ती संघटने'त अनुभव घेण्यासाठी देशा–परदेशांतून येतात तेव्हा त्यांच्याकडून संघटनेच्या कामाचेही ऑडिट करून घेत असते. कामे सोपी आणि चांगली करणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानाशी तिची झटकन मैत्री होते.

'स्त्री मुक्ती संघटने'च्या व्यापक चळवळीच्या छत्राखाली विकसित होत गेलेल्या ज्योतिला मी तीन दशकांपेक्षा जास्त काळ ओळखते. चार चौघींसारखी, साधी भासणारी, नोकरी, घर, संसार हे सर्व सांभाळून 'स्त्री मुक्ती संघटने'चे काम करणारी ज्योति किती विलक्षण आहे, किती वेगळी आहे हे आम्हा मैत्रिणींना सतत जाणवते. आजकाल सस्टेनेबल डेव्हलपमेंट, शाश्वत विकासाची संकल्पना वास्तवात आणण्याचे प्रयत्न जगभर होत आहेत. आर्थिक विकासाला सामाजिक विकास आणि पर्यावरण रक्षणाची जोड देणे हे त्यासाठी आवश्यक मानले जाते. ज्योतिचे सामाजिक काम म्हणजे शाश्वत विकासाची संकल्पना व्यवहारात आणण्याची धडपड आहे. समाजातील सर्व घटकांशी सौहार्दाचे आणि सहकार्याचे संबंध हे ज्योतिच्या उद्योजकतेमधून गुंतवले जात असलेले मोठे भांडवल आहे. ज्योति आज एक मोठी सामाजिक उद्योजक झाली आहे. समाजासाठी नफा मिळविणे हे तिचे ध्येय आहे पण तो नफा केवळ पैशांमध्ये मोजता येणारा नाही; ज्योतिच्या लोकसंग्रहातूनच तो मोजावा लागेल.

**सुलक्षणा महाजन**
८, संकेत अपार्टमेंटस, उदय नगर पांचपाखाडी,
ठाणे. ४००६०२
sulakshana.mahajan@gmail.com